| अर्जदाराचा पासपोर्ट फोटो |
|---|

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

## सन २०१८-१९ वर्षाकरिता

## रेती / वाळू उत्खनना च्या प्राप्तीसाठी ई- निविदा/ ई-लिलाव

## प्रपत्र अर्जाचा नमुना

**ई- निविदा क्रमांक-** ई-निविदा अर्जाची किंमत रु. ५०००/- (ना-परतावा)
(रु.दहा लक्ष किंवा त्यापेक्षा कमी किमतीचे रेतीघाटाकरीता
ई-निविदा अर्जाची किंमत रु. २०००/-) जिल्हाधिकारी यांचे नावे.
**(जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील खनिकर्म शाखेत धनादेशाव्दारे भरणा करावी)**

१. रेती गटाचे/घाटाचे नांव/गांव (यादीनुसार) :------------------------------------------

२. रेती घाटा चे आय डी क्रमांक (यादीनुसार) :------------------------------------------

३. रेती घाट कोणत्या तहसिलचा आहे :------------------------------------------

४. नदी अथवा नाल्याचे नाांव (उपलब्ध असल्यास):------------------------------------------

रेती घाटाची आराजी (यादीनुसार) :------------------------------------------

५. रेती घाटाची गट क्र / ख.क. इत्यादी :------------------------------------------

(उपलब्ध असल्यास) यादीप्रमाणे : ------------------------------------------

६. रेती घाटाची सरकारी किमान किंमत (अपसेट प्राईज) रु. :------------------------------------------

७. अर्जदाराने ज्या किंमतीत रेती घाट अ) अंकात रुपये :------------------------------------------

घेण्याचे ठरविले आहे ती किंमत ब) अक्षरी रुपये :------------------------------------------

८. अपसेट किंमती च्या २५% ऐवढी इसारा रक्कम रु. :------------------------------------------

९. २५% रक्कमे चा ईटीजीएस क्रमांक व दिनांक :------------------------------------------

१०. ईटीजीएस कोणत्या बॅकेतून काढण्यात आले आहे :------------------------------------------

११. ईटीजीएस काढण्यात आलेल्या बॅके ची शाखा :------------------------------------------

१२. अर्जदारा चे/ कंपनी चे/फर्म. चे पूर्ण नांव :------------------------------------------

कंपनी/फर्म रजिस्टेशन सर्टिफिकेट जोडावे. :------------------------------------------

१३. अर्जदाराचा पोष्टाचा पूर्ण पत्ता पिन कोड सह :------------------------------------------

१४. अर्जदाराचा दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र.:------------------------------------------

१५. अर्जदारा चा हल्लीचा व्यवसाय :----------------------------------------------------

१६. आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व वस्तू व सेवाकर विभागा चा, जीएसटिन (GSTIN) क्रमांकाची प्रत, शपथ पत्र आणि कंपनी/ फर्म असल्यास रजिस्टेशन प्रत जोडावे.

दिनांक: / /२०१९ **अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी**

**सहपत्र-**

१) टेंडर फी रु. ५०००/- भरणा केल्याबाबत ईटीजीएस पुरावा

२) अपसेट किमतीचे २५ % रक्कमे चा ईटीजीएस पुरावा

३) पॅन कार्ड छायांकित प्रत

४) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

५) मागिल वर्षाचे आयकर रिटर्नची छायांकित प्रत

६) टिन (TIN) क्रमांक प्रमाण पत्र

७) कंपनी/ फर्म असल्यास रजिस्टेशन प्रत

८) १००/- स्टॅम्प पेपर वर शपथ पत्र (ॲफेडेव्हीट/नोटरी)

" प्रारुप "

[signature] 3/4/19

अपर जिल्हाधिकारी,

अमरावती

# शपथपत्र

**(१००/- रु स्टॅम्प पेपरवर ॲफेडेव्हीट/नोटरी)**

(ई टेंडरींग निविदा धारकाकडून लिलावाची १/४ रक्कम भरुन घेतल्यानंतर भरावयाचे)

मी,------------------------------------------------- (पूर्ण नांव) रा.---------------------- ता.---------------------जि.------------------ रेती घाट लिलाव घेणार शपथेवर लिहुल देतो की, मी मौजा -----------------ता.---------------जि. अमरावती, येथील सर्व्हे नं./ग.क्र.-------- ---------------------क्षेत्र--------- हे.आ./चौ.मी. या रेतीघाटाचा सा २०१८-१९ या वर्षाकरीता (३०.०९.२०१९ पर्यंत) रु.---------------- (अक्षरी रु.------------------------------------------ ----------------) किंमतीस लिलाव घेतलेला आहे. सदर रेती घाट अपर जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूर केल्यास करारनाम्याच्या तारखेपासून दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत (किंवा अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडुन परवाना रद्द होईपर्यंत या पैकी जे अगोदर होईल.) मंजूर रेती साठयाचे उत्खनन व वाहतूक करण्यात येईल.

उक्त रेतीघाटाची ई-निवीदा भरण्यापूर्वी सदर रेती घाटाची मी, मोक्यावर जाऊन पाहणी केली असून रेती घाटाची स्थिती, रेती साठा व्यवस्थित दिसून आल्यावरच मी माझ्या मर्जी नुसार लिलाव घेतला आहे. भविष्यात नैसर्गिकरित्या अथवा अन्य कारणामूळे आणि डॅमचे तसेच तलावाचे पाण्यामूळे घाटाचे स्थितीत बिघाड होऊन किंवा शासकीय रस्ता उपलब्ध नसल्यामूळे/इतर कारणा मुळे रेती उत्खनन/वाहतूक करावयास अडचणी आल्यास शासना विरुध्द माझी कोणतीही तक्रार राहणार नाही व अशी स्थिती निर्माण झाल्यास रेतीघाटाच्या लिलावाची रक्कम मी परत मागणार नाही. रेतीघाट लिलावा बाबतच्या अटी व शर्ती मी स्वत: वाचल्या / वाचुन घेतल्या असुन त्यासाठी मी याव्दारे बंधनकारक आहे.

सदर रेतीघाटाचे ई-टेंडर/लिलावाच्या रक्कमेच्या १/४ रक्कम रु. --------------------- (अक्षरी रु.--------------------------------------------------------) ईटीजीएस/चलान क्र.--- ------------- दि.-----------नुसार शासकीय खजिन्यात/डि.डि.भरणा केली आहे. सदर रेतीघाटास अपर जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूरी प्रदान केल्यानंतर अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे सर्वात जास्त ई-टेंडरीगच्या-ई-लिलावाच्या रक्मेनूसार मंजूर, आदेशानूसार माझ्या व्दारे ३/४ रकमेचा भरणा व अनामत रकम रु. ३,००,०००/- किंवा लिलावाच्या २० टक्के या पैकी जास्त असेल तेवढी रकम १५ दिवसाचे आंत शासन जमा करण्यात येईल. विहीत कालावधीत असे न केल्यास मी भरलेली लिलावाची रक्कम शासन जमा होऊन व सदर घाट माझ्या नावाने रद्द होऊन पुन्हा लिलाव घेतल्यास यात माझी काहिही हरकत राहणार नाही. सदर घाट हा पुन्हा लिलाव झाल्यास त्या घाटाचे लिलावाच्या फरकाची रक्कम किंवा लिलाव न झाल्यास यापुर्वी घेण्यात आलेल्या लिलावाची ३/४ रक्कमेचा भरणा करण्यास सहमत आहे. आणि असे जर न केल्यास जमिन महसूलाची थकबाकी म्हणून सदर रक्कम माझेकडून भरणा करण्यात येईल व माझे सदर रेती घाटावर कोणताही मालकी हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. सदर नूकसान भरपाई बाबत शासना कडे कोणतीच फिर्याद करणार नाही, किंवा न्यायालयात धाव घेणार नाही. सदर रेतीघाटास अपर जिल्हाधिकारी अमरावती यांनी मंजूरी प्रदान केल्यानंतर अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे सर्वात जास्त ई-टेंडरीगच्या-ई-लिलावाच्या रक्मेनूसार मंजूर, आदेशानूसार माझ्या व्दारे जीएसटी च्या देय रकमेचा भरणा शासनाचे आदेशानुसार भरण्यास माझ्यावर बंधनकारक राहील.

रेती उत्खनना व वाहतूकी बाबतच्या सर्व अटी/शर्थीचे मी पूर्णत: पालन करीन याचे उल्लंघन केल्यास मी दंडनिय कार्यवाईस पात्र राहील.

१) जमानतदाराचे पूर्ण नांव व पत्ता ------------------------------- सही -----------------

२) जमानतदाराचे पूर्ण नांव व पत्ता ------------------------------- सही -----------------

लिलावधारकाची सही --------------

# रेतीघाट लिलाव सन २०१८-२०१९

## पृथक पृथक लॉट

## लॉट क्र. १ ते ९

| लॉट क्र. १ ते ०९ | रेतीघाटाचे नांव | तालुका | नदी/ नाला | स्थळदर्शक स.नं./ गट नं. | लांबी (मी) | रुंदी (मी) | रेतीघाटाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | प्रस्तावित रेती उत्खननाची खोली (मी) | अंदाजीत रेतीसाठा (ब्रास) | रेती घाटाची अपसेट किंमत (रु.) | १/४ रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | देऊतवाडा-१ | वरुड | वर्धा | ९६ ते १००, ११६, ११९ ते १२१, १२६, ते १३८ | ३८० | १८ | १०८४० | ०.५ | १२०८ | २२३५२०० | ५५८८०० |
| २ | निंभार्णी | मोर्शी | वर्धा | १ | ११० | ३५ | ३८५० | ०.५ | ६८० | १२५८२०० | ३१४५५० |
| ३ | तुळजापूर | मोर्शी | वर्धा | १ | ६० | ३० | १८०० | ०.५ | ३१८ | ५८८४०० | १४७१०० |
| ४ | येसुर्णा | अचलपूर | सापन | १५,५१,५०, ३९, ४५ ५०१, ५०७, ४९९, ४९३ | १२० | ३० | ३६०० | ०.५ | ६३६ | ११७६८०० | २९४२०० |
| ५ | निंभारी | अचलपूर | सापन | २२०,२१९,२१८,२२४,२०८ ते २१३, २१२, २११,२१०,२०९,२०८,९,८,२२३ , २२२ | ६० | २० | १२०० | ०.५ | २१२ | ३९२३०० | ९८०७५ |
| ६ | टकारखेडा पुर्णा | चांदुर बाजार | पुर्णा | ६८,११३,१२२, १२३, १२६, १२७, १२८, १२९,१६९, २७० | ३०० | २५ | ७५०० | ०.५ | १३२५ | २४५१६०० | ६१२९०० |
| ७ | खा-या टेंबरु | धारणी | तापी | ४७,८२ | २०० | १५ | ३००० | ०.५ | ५३० | ९८०७०० | २४५१७५ |
| ८ | उंबरखेड | तिवसा | वर्धा | ५१,५२ | ३०० | ५० | १५००० | ०.५ | २६५० | ४९०३२०० | १२२५८०० |
| ९ | गोकुळसरा | धामणगांव रेल्वे | वर्धा | १ ते ३, ८ ते ११ | ५६० | ६० | ३३६०० | ०.५ | ५९३६ | १०९८३२०० | २७४५८०० |
| **एकूण** | | | | | | | | | **१३४९५** | **२४९६९६००** | ६२४२४०० |

(signature) 3/4/19

अपर जिल्हाधिकारी, अमरावती

## रेती घाट लिलाव सन २०१८-२०१९

**ई -टेंडर व ई-लिलाव करणेसाठी वेळपत्रक खालील प्रमाणे आहे.**

| दिनांक | तपशील |
|---|---|
| ०४.०४.२०१९ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १२.०४.२०१९ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| ०८.०४.२०१९ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १६.०४.२०१९ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्तीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. EMD ची रक्कम दिनांक १६.०४.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे अपेक्षीत आहे. त्यानंतर जमा केलेल्या EMD च्या रकमेबाबत विलंब झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| २०.०४.२०१९ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>१.गट (लॉट) क्रमांक-१ ते ९ (पृथक पृथक individual sand ghats) दुपारी १२.०० ते ०१.०० वाजेपर्यंत.<br><br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून अमर्यादित असेल. त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्यात येईल. |
| २०.०४.२०१९ | ऑनलाईन प्राप्त ई -निविदा दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे डाऊनलोड करुन उघडण्यात येतील.ई-निविदा आणि ऑक्शन यामध्ये जे किमंत जास्त असले त्यास लिलाव मंजूर करण्यात येईल. |

3/4/19

**अपर जिल्हाधिकारी अमरावती**

# ई-निविदा सूचना
## अमरावती जिल्हयातील रेती घाटांचा लिलाव

## ई-निविदा/ई-लिलाव-सन २०१८-२०१९
## (वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण २०१८ नुसार)

जाहीर सुचना देण्यांत येते की, अमरावती जिल्हयातील ७ तालुक्यातील ९ रेतीघाटाचे ई-टेंडरींग / ई-ऑक्शन, राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण समिती च्या मंजूरीने करण्यांत येत आहे.

सन २०१८-२०१९ करिता दि. ३०/०९/२०१९ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदा निर्गती करणेसाठी https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. तसेच ई-लिलावाकरीता https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटचा उपयोग करावा. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. इच्छूक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

रेती घाटाचे ई-टेंडरींग करते वेळी सर्व प्रथम तालुकावार लॉटकरीता प्राप्त किंमतीस प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर व ई-लिलावाला नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल. त्या लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे तो रेती घाट मंजूर करण्यात येईल. मात्र सदरच्या जाहीर लिलावास फक्त त्या त्या रेती गटाचा ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतरांना भाग घेता येणार नाही. ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता इच्छुक कंत्राटदाराना उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी करीता डिजिटल सिग्नेचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. निविदेचा नमूना, प्रतिज्ञापत्र, रेती घाट यादी, अटी व शर्ती, रु. ६५९३/- (१० लाखा पेक्षा कमी किमतीच्या रेती घाटा करीता रु. ३५९३/-) (ना-परतावा) टेंडर फि अधिक प्रोसेसिंग फि ऑन-लाइन जमा केल्यानंतर निविदाधारकाला संकेतस्थळावरुन ऑनलाईन ई-निविदा खरेदी करता येईल. रेती घाटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

## ई -टेंडर व ई-लिलाव करणेसाठी वेळपत्रक पुढील प्रमाणे आहे.

| दिनांक | तपशील |
|---|---|
| ०४.०४.२०१९ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १२.०४.२०१९ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| ०८.०४.२०१९ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १६.०४.२०१९ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्तीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. EMD ची रक्कम दिनांक १६.०४.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करणे अपेक्षीत आहे. त्यानंतर जमा केलेल्या EMD च्या रकमेबाबत विलंब झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| २०.०४.२०१९ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br><br>१. गट (लॉट) क्रमांक- १ ते ९ (पृथक पृथक individual sand ghats) दुपारी १२.०० ते ०१.०० वाजेपर्यंत.<br><br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून |

| | |
|---|---|
| | अमर्यादित असेल. त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्यात येईल. |
| २०.०४.२०१९ | ऑनलाईन प्राप्त ई-निविदा दुपारी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे डाऊनलोड करुन उघडण्यात येतील.ई-निविदा आणि ऑक्शन यामध्ये जे किमंत जास्त असले त्यास लिलाव मंजूर करण्यात येईल. |

टिप- गट (लॉट) निहाय रेतीघाटाची माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**वाळु लिलावाकरीता बोलीदार/खरेदीदारांसाठी महत्वाची सूचना (२०१८-२०१९)**

- **डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग २ किंवा ३ साईनिंग +एनक्रिप्श्न नोंदणीच्या वेळी संलग्न करणे आवश्यक आहे**
- **बोलीधारकांना घाट निवडणे व त्यांना खरेदी कराची घाट्सची दर भरुन घ्यावी लागेल. त्यानंतर निवडलेल्या घाटासाठी सहभाग शुल्क, निविदा दस्तऐवज फी आणि ईमडी देण्यास सक्षम असतील**
- **कृपया लक्षा घ्या की, आरटीजीएस/एनईएफटी व्दारे रक्कम आपल्या बिडर आयडीमध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ आवश्यक आहे. म्हणुनच कृपया खात्री करा की, आपण पेमेंट गेटवेवर आरटीजीएस/एनईएफटी पर्याव्दारे कागदपत्र शुल्क/ईमडी देयक भरण्याआधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठवावयाचा आहे.**
- **एकदा बोलीदाता अंतिम सबमिशन पूर्ण केल्यानंतर , तो इतर घाटांना जोडण्यास किंवा बोली करण्यास सक्षम असणार नाही, म्हणुनच बोलीदाराने स्वत: ला त्याच्या बिडने स्वत:ची पुर्तता आणि ती फक्त ई-निवीदा मध्ये अंतिम सबमिशन चरण पूर्ण करेल.**

कार्यालयीन वेळ
सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ७.०० वाजता
पहिला, तिसरा आणि ५ वा शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता
२ रा आणि ४ था शनिवार बंद
सर्व रविवार बंद

**संपर्क तपशिल : नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी ,डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजुरीसाठी कृपया खालील क्रमांकवर संपर्क साधा.**

| अनुक्रमांक | व्यक्तीचे नांव | संपर्क क्रमांक | मोबाईल नंबर | ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | सोनू टँक | ०७९ ६८१३६८७८ | | Sonu@abcprocure.com |
| २ | सताब्दी डे | ०७९६८१३६८४५ | +९१६३५३२१७०८० | Satabdi@abcprocure.com |

ई-निवीदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करतांना कोणत्याही तांत्रिक समर्थनासाठी , कृपया खाली क्रमांकवर कॉल करा.

ईनिवीदा आणि ई-लिलाव मये बोली करतांना कोणत्याही तांत्रिक सर्मनासाठी, कृपया खाली क्रमांक वर कॉल करा.

| एस्केलेशन मॅट्रिक्स | | | | |
|---|---|---|---|---|
| नांव | संपर्क क्रमांक | मोबाईल नंबर | ईमेल आयडी | सर्वांसाठी सामान्य ई-मेल आयडी |
| पंकेश कुमार | ०७९६८१३६८४८ | ९३७४५१९७२९ | pankesh@eptil | support@abcprocure.com |
| | ०७९६८१३६८४९ | | | |
| | ०७९६८१३६८५० | | | |
| | ०७९६८१३६८५४ | | | |
| ई-पेमेंट संबंधित समर्थनासाठी, Payment @eptil.in वर मेल करा आणि उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधा | | | | |

(सही) 3/4/19
**अपर जिल्हाधिकारी अमरावती**

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
# रेती घाट ई-टेंडरींग व ई-लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती
## (ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव)

सन 2018-19 करीता अमरावती जिल्ह्यातील रेतीघाटांचे शासन निर्णय क्र. गौखनि 10/0615/प्र.क्र.289/ख दि.03 जानेवारी, 2018 मधील तरतुदी व अटी शर्ती राष्ट्रीय हरित लवाद यांचा आदेश दिनांक 22 नोव्हेंबर, 2017 आणि मा. उच्च न्यायालय,नागपूर यांचे आदेश दिनांक 21 डिसेंबर, 2017 मधील सूचनेनुसार तसेच राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यमापन समितीच्या पुर्व अनुमतीने ई-निविदा व ई-लिलाव घेण्यात येत आहेत.

**अ)** सन २०१८-१९ करिता दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत मुदतीसाठी वाळू/रेती निर्गती नवीन धोरण शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्र. गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८९/ख दिनांक ०३/०१/२०१८ तसेच शासन (महसूल व वन विभाग) निर्णय क्रमांक गौखनि-१०/ख/४९८.प्र.क्र./१०१४ दिनांक २३ डिसेंबर, २०१४ अन्वये रेती घाट ई-टेंडरींग-नि-ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१. अमरावती जिल्हयातील रेती घाटाचे ई-टेंडरींग-ई-लिलाव करते वेळी सर्व प्रथम जिल्हा, उपविभाग, तदनंतर तालुकावार आलेल्या संयुक्त रेती स्थळांच्या अपसेट किंमती पेक्षा जास्त किमत प्राप्त झाल्यास त्या किंमतीस प्रथम, द्वितीय हया प्रमाणे प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-निविदा-ई-लिलावाला नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल.

२. ई-लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे किंवा ई-निविदा यापैकी जी किंमत ज्यास्त असेल त्या रेती घाटचा लिलाव मंजूर करण्यात येईल. **मात्र सदरच्या ई-लिलावास फक्त त्या त्या रेती गटाबाबत ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतरांना भाग घेता येणार नाही.**

३. अमरावती जिल्हयातील रेतीघाट लिलाव सन २०१८-१९ करिता दि. ३०/०९/२०१९ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदा/ई-लिलाव द्वारे निर्गती करणेसाठी ई-निविदा/ई-लिलाव https://amravatico.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर वेबसाइटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती च्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे.

४. **ई-निविदा-ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता कंत्राटदारांना डिजिटल-सिगनेचर असणे तसेच उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.** ई-निविदा नमुना फॉर्म, प्रतिज्ञापत्र, रेती स्थळांची/गटाची यादी, अटी व शर्ती, रु. ६५९३/- (ना-परतावा) टेंडर फी ई-पेमेंट जसे नेट-बैंकिंग/केडीट-कार्ड/डेबिट-कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने ICICI Bank, अमरावती यांचे कडे रु. ६५९३/- (मात्र वाळू गटाची हाताची किमत रु. १० लाख व त्यापेक्षा कमी असेल अशा वाळूगटा साठी अर्जाचे शुल्क रु. ३५९३/-) भरना करुन वरील वेबसाईट वरुन डाऊनलोड करुन खरेदी करता येईल. रेती स्थळ/गटा संबंधी ची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (वरीलप्रमाणे टेंडर फिमध्ये प्रतिटेंडर रु. १५९३/- प्रोसेसिंग फि समाविष्ट आहे.)

५. ई-निविदा सोबत लिलावधारकास ठराविक नमुन्यातील डाऊन-लोड केलेला अर्ज भरुन तसेच रु. १००/- स्टॅम्प पेपरवर शपथपत्र, पॅन कार्ड (PAN CARD) आणि वस्तू व सेवाकर विभागाचा रजिस्ट्रेशन क्रमांक GSTIN/ TIN Number, शपथपत्र, मागील दोन वर्षाचे आयकर विवरणपत्र, कंपनी / फर्म असल्यास रजिस्ट्रेशनची प्रत विहित कालावधीत अपलोड करणे बंधनकारक आहे. पॅन कार्ड व जीएसटीन / टिन क्रमांक असलेल्या ई-निविदा-ई-लिलाव धारकांनाच लिलावात सहभागी होता येईल.

६. नियमित आयकर भरत असल्याच्या पुरावा, पॅन क्रमांक व वस्तू व सेवाकर विभागा च्या जीएसटिन/ टिन क्रमांक, कंपनी/ फर्म असल्यास रजिस्ट्रेशनाची प्रत असलेल्या निविदा धारकांच्याच ई-निविदा वैध ठरविल्या जातील. ज्या निविदाधारकानी निविदे सोबत आवश्यक कागदपत्रे जसे पॅन क्रमांक, जीएसटिन क्रमांक व १/४ रक्मेचा ई-पेमेंट केल्याचे पुरावे जोडले नाहीत अशा निविदा धारकांची निविदा अवैध ठरविण्यात येईल.

७. रेती/वाळू स्थळ/गटाकरिता फक्त ई-निविदा स्विकारण्यात येतील. ज्या निविदाधारकानी संकेतस्थळावर दिलेल्या ई-निविदा भरल्या नाहीत अशा निविदाधारकांच्या निविदा अवैध ठरविण्यात येतील. व त्यांना त्यानंतर होणा-या ई-लिलावात सुध्दा भाग घेता येणार नाही. या बाबत कार्यालयात दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.

८. ई-लिलाव उघडण्याच्या दिवशी निविदाधारकाने निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेली कागदपत्रे व २५% रक्कम ई-पेमेंट केल्याबाबतचा पुरावा सोबत आणावे व ज्या निविदाधारकाची निविदा सर्वोच्च आहे अशा निविदाधारकाने स्वाक्षरी केलेली निविदा कागदपत्रे व ई-पेमेंट बाबतचा पुरावा सादर करावित.

९. ई-निविदा-ई-लिलाव द्वारे प्राप्त झालेले देकार सरकारी किंमती पेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटा च्या फेर ई-निविदा/लिलाव बोलाविण्यात येईल.

१०. ई – निविदा व ई- लिलाव हे मा. उच्च न्यायालय, नागपूर यांचे आदेश दिनांक 21 डिसेंबर, 2017 मधील सूचनेनुसार तसेच जिल्हास्तरीयपर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाचे अनुमतीनुसार घेण्यांत येत आहेत.

११. दिनांक 30 सप्टेंबर,2019 लिलावाची अंतिम मुदत असली तरी 3000 ब्रास पर्यंतच्या परिमाणाकरिता 3 महिने किंवा 30 सप्टेंबर यापैकी जो कमी असेल तो कालावधी, 3000 ते 4500 ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळुगटाकरिता $4^{1/2}$ ( चाढेचार महिने) किंवा 30 सप्टेंबर यापैकी जो कमी असेल तो कालावधी, 4501 ते 6000 ब्रासपर्यंतच्या परिमाणाच्या वाळुगटाचे लिलाव 6 महिने किंवा 30 सप्टेंबर यापैकी जो कमी असेल तो कालावधी, 6001 ब्रास व त्यावरील परिमाणाच्या वाळुगटाचे लिलाव दिनांक 30 सप्टेंबर पर्यंतच्या कालावधीकरिता करण्यात येत आहेत.

१२. दिनांक 10 जुन ते 30 सप्टेंबर या कालावधीमध्ये पाण्याखालील वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

१३. लिलावाच्या जाहिरातीमध्ये नमूद वाळू/रेती स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील. वाळू/रेती गटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळू उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

१४. लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन घेण्यात येणारी 1/4 रक्कम नेट बॅंकीग, क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, (एनईएफटी / आरटीजीएस) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जिल्हाधिकारी अमरावती यांच्या खात्यात जमा करावी लागेल.

१५. सर्वोच्च बोलीचा देकार/निविदा स्विकारण्यांत आलेल्या लिलावधारकाला लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या ¼ इतकी रक्कम 25 टक्के लिलावाच्याच दिवशी प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात भरावी लागेल. तसेच ¾ रक्कम 75 टक्के लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आंत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात 15 दिवसांत भरणार असल्याचे रु. 100/- चे मुद्रांकावर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१६. लिलावाच्या उच्चतम मंजूर बोलीप्रमाणे 3/4 रक्कम लिलावधारकाने लिलाव दिनांकापासून 15 दिवसांचे आंत जमा करणे बंधनकारक राहील व त्यानंतर नियमानुसार करारनामा करुन लिलावधारकास वाळू/रेतीघाटाचा विहीत कालावधीत ताबा देण्यात येईल.

१७. सर्वोच्च ई - निविदा, ई – लिलावधारकाने सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, सर्व्हेक्षण शुल्क, भूपृष्टभाडे (ग्राम पंचायत, जिल्हा परिषद आणि अकृषक कर), भाडेपट्टा शूल्क, शासकिय प्रती ब्रास किंमती प्रमाणे एकुण वाळु साठाच्या किंमतीच्या 10 टक्के जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंशदानाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

१८. क्र. गौखनि 10/0615/प्र.क्र. 289/ख दि. 3 जानेवारी, 2018 मधील नमूद सर्व तरतूदी आणि अटी व शर्ती निविदाधारक/लिलावधारक यांना बंधनकारक राहील.

१९. लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त घेतील.

२०. लिलावधारकाने देकाराची उर्वरीत ¾ रक्कम विहित कालावधीत न भरल्यास तसेच विहित कालावधीत करारनामा करुन न दिल्यास त्याला वाळू/रेती गटाचा ताबा देण्यांत येणार नाही. अशा लिलावधारकाने शासनजमा केलेली ¼ रक्कम जप्त करण्यात येईल व अशा वाळू/रेतीगटाचा फेरलिलाव करण्यांत येईल.

२१. कोणत्याही कारणास्तव वाळू/रेती गटाचा लिलाव रद्द करण्यांत आल्यास अशा वाळू/रेती गटाचा नव्याने लिलाव करण्यांत येईल. फेरलिलाव किंवा नव्याने लिलाव केल्यास पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यांत येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या लिलावापेक्षा जास्त किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

२२. लिलावधारकाने वाहतुकीदरम्यान सार्वजनिक अथवा खाजगी पाण्याच्या पाईप लाईनचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तद्वतच अनावधानाने कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

२३. लिलावाची मुदत संपल्यानंतर लिलावधारकाने अनुज्ञेय मर्यादेत उत्खनन केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

२४. वाळूच्या वाहतुकीकरिता वापरण्यांत येणा-या वाहनांवर स्वखर्चाने जीपीएस सिस्टीम बसविणे बंधनकारक राहील.

प्रचलित पध्दतीनुसार (अ) अमरावती जिल्हा एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली (ब) तालुका एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च बोली (क) पृथक, पृथक एक घटक यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल. जिल्हा एक घटक म्हणून बोली किंवा निविदा प्राप्त न झाल्यास उपरोक्त (ब) आणि निविदा प्राप्त न झाल्यास (क) स्वतंत्र वाळूघाटनिहाय प्राप्त रेती घाटाच्या सर्वोच्च बोली यापैकी जे अधिक असेल त्यास मंजूरी देण्यात येईल.

**वाळू/रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध, अटी व शर्ती.**

1. लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्य ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहित क्षेत्राच्या बाहेर उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.
2. मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र. 19628-1629/2009 मध्ये दि. 27/02/2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहाण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू गटातून अनुमती दिलेल्या खोलीपर्यंतच उत्खनन करता येईल.
3. नदीपात्रातील वाळूथराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंचमार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजुच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही याबाबत योग्स ती दक्षता लिलावधारकाने घेणे बंधनकारक राहील.
4. वाळूचे उत्खनन व वाहतूक सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. याकालावधीव्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन व वाहतूक अवैध समजून कारवाई करण्यात येईल.
5. कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजुने 600 मीटर्स (2000 फुट)अंतराच्या आंत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.
6. सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया असलेल्या अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.
7. खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या वाळू/रेती काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही.
8. लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतुकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळुगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करुन वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये साठवून विक्री करावी. डेपोपर्यंतच्या वाळू वाहतुकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॉलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवडयाला तहसिलदार यांना सादर करावेत.
9. नदीपात्रात निश्चित केलेल्या वाळूगटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू भरण्यासाठी कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही.
10. प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी 24/7 छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक राहील. यापैकी किमान एक सीसीटीव्ही कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळूभरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा. वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन येजा करतात त्या ठिकाणी एक सीसीटीव्ही कॅमेरा लिलावधारकास लावणे बंधनकारक राहील.
11. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.
12. रेती/वाळू स्थळांच्या एकत्रित समूहाकरीता/स्वतंत्र वाळूघाटाकरिताई-निविदा स्विकारण्यात येतील. ज्या निविदाधारकांनी संकेतस्थळावर दिलेल्या ई-निविदा भरल्या नाहीत अशा निविदा धारकांच्या निविदा अवैध ठरविण्यात येतील तसेच त्याबाबत या कार्यालयात अथवा न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.
13. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा जास्त सर्वोच्च किंमतीच्या ई-निविदाधारकांस रेती घाटांची निर्गती करण्यास नियमानुसार प्राधिकृत करण्यात येईल.
14. ई-निविदाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाच्या फेर ई-निविदा/लिलाव बोलविण्यात येईल.
15. ई-निविदेद्वारे घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत निवीदाधारकाची राहील.
16. निविदेतील प्राप्त सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारणे किंवा नाकारणे याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी घेतील व सदर निर्णय संबंधितास निविदा उघडण्याचे दिवशीच कळविण्यात येईल.
17. अमरावती जिल्ह्यात ई-निविदा प्रणालीचा वापर होत असल्यामुळे कोणतीही तांत्रीक चुक होणार नाही याची निविदाधारकाने दक्षता घ्यावी.

18. सर्वोच्च ई-निविदा स्वीकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर 15 दिवसांत ई-निविदेतील नमूद केलेल्या उर्वरित रक्कमेचा भरणा करणे बंधनकारक आहे, अशा हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तींसह निविदाधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा रद्द करुन संबंधीत रेती घाटाच्या फेर निविदा बोलविण्यात येतील. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी निविदाधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. निविदेमधील नमूद रकमेपैकी भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75 %(3/4)रक्कम सर्वोच्च ई निविदा स्विकारल्यापासून अथवा अंतिम केल्यापासून 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल व 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल.

19. लिलावधारकाला नदीपात्रातून/नाल्यातून रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करतांना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

20. लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

21. लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

22. लिलावधारकास वाळुची/ रेतीची वाहतुक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सरकारी संस्था/ संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

23. वाळुची वाहतुक करतांना वाहनातील वाळु प्लास्टीक पेपरने/ ताडपत्रीने आच्छादीत करूनच वाळुची वाहतुक करणे बंधनकारक आहेत. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

24. लिलावधारकाने त्याचे लिलाव स्थळातील रेती/ वाळुची वाहतुक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परीमाणाची वाहतुक करावी. वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची वाळु वाहुन नेत असल्याचे आढळुन आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटरवाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनिय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल.

25. रेतीचे उत्खनन अथवा वाहतूक करतांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये द्यावी.

26. लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौणखनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबंधीत विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा पूर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहीजे.

27. रेतीचे उत्खनन करते वेळी जर काही प्रमूख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचे कडे सांत दिवसांत कळविले पाहीजे.

28. अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही.

29. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्यानेच रेतीचे उत्खनन करण्याची जवाबदारी लिलावधारकाची राहील. वाळूस्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूस्थळात पाणी आहे, वाळूगटातील वाळू माती मिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलवून दिला जाणार नाही.

30. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी यांनी केलेला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जवाबदारी लिलावधारकाची असेल. वाळू ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळूचे उत्खनन केले आहे त्या रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसांत उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्याच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच, लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतुकीसाठी दुय्यम वाहतुक पासेस देण्यात येणार नाहीत.

31. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय लिलावधारकास लिलाव/ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणासही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

32. लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केले आहे, त्याबाबतचे विवरणपत्र दर महिन्याच्या 10 तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत त्यांचे विरुध्द ठेका रद्द करणेबाबत तसेच त्यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

33. निविदाधारक, त्यांच्या ई निविदा क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातुन वाळूचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिका-यांचे निर्णय अंतिम असतील.

34. वाळूच्या उपस्या करीता सक्शन पंम्प सारख्या व इतर यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही.

35. कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा /स्त्रोतचे 100 मी. परिसरात रेती उत्खनन करता येणार नाही.

36. वाळूचे/रेतीचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणातीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

37. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या रेतीच्या वाहतूकीसाठी आवश्यक परवाने/पासेस पुस्तके निविदाधारकाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. असे पासेस उपलब्ध करुन देतांना निविदाधारकास वाळू गटात उपलब्ध असलेला मंजूर वाळूसाठा व उत्खनन विचारात घेऊन आवश्यक तेवढेच पासेस पुस्तके निविदाधारकास देण्यांत येतील. असे वैध परवाने/पासेस धारण करणा-यांनाच वाळू/रेतीची वाहतुक करता येईल.

38. प्रत्येक वाहतूक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील. सर्व जिल्ह्यात याच पध्दतीने वाहतुक पावती देणे बंधनकारक राहील. लिलावाची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाळूसाठया इतके उत्खनन करण्याचा कायदेशीर अधिकार निविदाधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजित वाळूसाठया इतकेच उत्खनन/वाहतूक परवाने निविदाधारकास देण्यात येईल.

39. शासनाचे निर्देशानुसार वाहतुक पावतीवर बारकोडिंग किंवा तत्सम उपाय योजना करण्याचे निश्चित करण्यात आल्यास बारकोड रिडर तसेच त्याकरीता आवश्यक संगणक इतर बाबीची पूर्तता स्वखर्चाने लिलावधारकास करावी लागेल.

40. रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून शासन निर्णय दि. 25/10/2010 पासून वाळूचा किमान 6 फुट साठा शिल्लक ठेवूनच रेतीच्या प्रस्तरातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सर्वेक्षणानंतर विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांस हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी निविदाधारकाने घ्यावयाची आहे. भूजल सर्व्हेक्षण शुल्क रु. 5000/- प्रती घाट याप्रमाणेचा धनाकर्ष उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती यांचे नावाने जमा करावा लागेल.

41. निविदाधारकाने करारनामा करतेवेळी ई-निविदा अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. 300000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातची किंमतीच्या 20% रक्कम अनामत रक्कम म्हणून घ्यावी, ही रक्कम निविदाधारकाने ई-निविदेच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास ई-निविदेची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल.

42. कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/मा. विभागीय आयुक्त/मा. जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल. सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासुन 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडेच उत्खनन करणे बंधनकारक आहे.

43. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल. लिलावधारकांनी त्यांनी दिलेल्या करारनाम्यातील कुठलीही अटीचे भंग केल्यास सक्षम प्राधिकारास लिलाव रद्द करण्या व्यतिरिक्त योग्य शास्ती लादता येईल.

44. पर्यावरणाचे संतूलन राखणेसाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खडडे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

45. विक्रीकर भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच आयकर व मुद्रांक शुल्क रक्कम शासन जमा करुनच करारनामा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. या शिवाय जिल्हापरिषद कर/ग्रामपंचायत कर ई. विहीत केलेल्या प्रमाणे संबंधित तहसिलदारांकडे अदा करावे लागेल.

46. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राची सक्षम विभागाकडून स्वखर्चाने मोजनी करुन घेवून सिमा दर्शविणारा फलक योग्य दर्शनीय ठिकाणी लावणे आवश्यक आहे. मंजूर क्षेत्राचा ताबा निविदाधारकांनी संबंधित तहसिलदाराकडून प्राप्त करुन घ्यावी. मंजुर केलेल्या रेती घाटाचे स्वःखर्चांनी तालुका निरिक्षक भूमी अभिलेखचे मोजणी व सिमांकन केलेल्या नकाशाचे दोन प्रती सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

47. वाळू उत्खनन व वाहतुक वाहनाची यादी वाळू उपासा पूर्वी तहसिल कार्यालयास सादर करावी लागेल. रेती/वाळू उत्खननाची वेळ सकाळी 6.00 ते संध्याकाळी 6.00 वाजे पर्यंतच (सुर्योदय ते सुर्यास्त) राहील. त्यानंतर उत्खनन आढळल्यास अवैध समजण्यात येईल.

48. रेती लिलावाच्या रकमेच्या 2.00 टक्के आयकर (TCS) भरणा करणे बंधनकारक आहे. Under Section 206 C(IC).

49. ज्या व्यक्तीचा उच्चतम देकार स्विकारण्यात येईल. त्याने पर्यावरण शुल्काचा (ई-निविदेतील बोलीच्या रक्कमेच्या 2 टक्के) रक्कमेचा भरणा करावा लागेल.

50. ई-निविदांचे अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे तसेच पूर्व सूचना न देता ई-निविदा तहकुब करणे रद्द करणे तसेच ई-निविदा नामंजूर करणे इत्यादी सर्व अधिकार जिल्हाधिकारी अमरावती यांनी राखून ठेवले आहेत.

51. सिल्टेशन (Siltation) स्टडी बाबतचा अहवाल वाळु उत्खननापूर्वी अथवा वाळु उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ यंत्रणा जसे NIO/CWPRS कडून करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ यांचेकडेसादर करावा लागेल.

52. ज्या ठिकाणी कासवांची घरटी (Turtle Nesting) असेल त्या ठिकाणाहून वाळु उत्खनन करण्यास निर्बंध राहील.

53. मंजुर क्षेत्रापैकी कमीतकमी 20 टक्के क्षेत्रामध्ये नदी तिरावर तसेच गावातील वाहतुक रत्यावर झाडे लावून हरीयाली (Green Belt) करावी लागेल.

54. उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Management च्या बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यांत याव्यात.

55. उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी लागेल.

56. उत्खननाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्दपाणी, वैद्यकीय उपचार व इतर आवश्यक सुविधा (कामगार कायद्यानुसार) उपलब्ध करुन द्यावी लागेल.

57. वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

58. ई-टेंडर धारकाने वाळु उत्खननाबाबतचा मासिक व सहामाही अहवाल झेरॉक्स प्रत व सि.डी./पेनड्राव्हयु मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय व पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

59. पर्यावरण विभागाने मंजूरी प्रदान करतांना घालून दिलेल्या सर्व अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील. पर्यावरण विभागाने दिलेली पर्यावरण विषयक मंजूरी 30 सप्टेंबर, 2019 पर्यंतच असून त्यानंतर पर्यावरणावर होणा-या परिणामांची माहिती घेवून पुढील कालावधीकरीता पर्यावरण विषयक मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येईल. पर्यावरण विभागाने पर्यावरण विषयक मंजूरी कोणत्याही क्षणी नाकारल्यास हा हर्रास/निविदा रद्द करण्यात येईल व रेती उत्खनन तात्काळ थांबविण्यात येईल व त्यामुळे होणा-या कोणत्याही नुकसानीबाबत निविदाधारकास दाद मागण्याचा अधिकार राहणार नाही.

60. बार कोड पावत्या, बारकोडींग प्रणाली करीता येणारा सर्व खर्च निविदाधाकांकडून वसूल केला जाईल.

61. ट्रॅक्टर द्वारे रेतीच्या वाहतुकीकरीता ट्रॅक्टर धारकाकडे वाणिजिक वाहतुकीचा परवाना असणे बंधनकारक आहे.

62. शासनास आवश्यकता भासल्यास रेती घाट रदद करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत तसेच जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

अपर जिल्हाधिकारी, अमरावती

3/4/15